<u>**स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड**</u>

# निष्पक्ष आचार संहिता

Version 5, October 2024

| | |
|---|---|
| **तपशील** | **तपशील** |
| **शीर्षक** | **निष्पक्ष आचार संहिता** |
| **आवृत्ती** | **5** |
| **परीक्षण दिनांक** | **October 24, 2024** |
| **स्वीकृती आणि परीक्षण** | **मंडळाद्वारे** |

सदर संहिता 18 फेब्रुवारी 2013 तारखेच्या रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्रमांक 2012-13/416/DNBS CC PD No 320/03.10.01/ 2012-13 आणि 18 ऑगस्ट 2023 तारखेच्या अलीकडील रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्रमांक RBI/2023-24/53 DoR.MCS.REC.28/01.01.001/2023-24 च्या संदर्भात आहे ज्यामध्ये भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने एनबीएफसी साठी निष्पक्ष आचार संहितेच्या अंमलबजावणी करीता मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधार केला आहे.

इथे खाली नमूद केल्याप्रमाणे, निष्पक्ष आचार संहिता (एफपीसी) या वर नमूद केलेल्या आरबीआय परिपत्रकात समाविष्ट असलेल्या एनबीएफसीसाठी असलेल्या निष्पक्ष आचार संहितेच्या मार्गदर्शक तत्वांशी सुसंगत आहेत. हे ग्राहकांसोबत व्यवहार करताना कंपनीसाठी किमान निष्पक्ष व्यवहाराची मानके निर्धारित करतात. हे ग्राहकांना माहिती देते आणि स्पष्ट करते कि कंपनीने दैनंदिनपणे त्यांच्याशी कशाप्रकारे व्यवहार करणे अपेक्षित आहे.

हे धोरण सर्व ग्राहकांना लागू होते ज्यामध्ये सोशल/ इतर कोणत्याही प्रसारमाध्यमाद्वारे पोस्ट केलेल्या कोणत्याही तक्रारी/चौकशी करणाऱ्या ग्राहकांचा सुद्धा समावेश आहे आणि आम्ही सर्व ग्राहकांना आवश्यकतेनुसार खालील मंचावर संपर्क करण्यासाठी प्रोत्साहन देतो. कंपनी सर्व ग्राहकांच्या फायद्यासाठी एफपीसी सर्व कार्यालयांमध्ये आणि ग्राहक सेवा केंद्रासोबत, तिच्या संकेतस्थळावर प्रामुख्याने प्रदर्शित करेल आणि त्याचे काटेकोरपणे पालन करेल.

**संहितेचे उद्दिष्ट्य**

सदर संहिता या उद्देश्याने विकसित केली गेली आहे:

- ग्राहकांसोबत व्यवहार करताना निष्पक्ष व्यवहारांची खात्री करणे
- उत्कृष्ट पारदर्शकता ज्यामुळे ग्राहकांना उत्पादनाविषयी चांगली समज मिळते आणि ते माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात
- कंपनीवर ग्राहकांचा विश्वास निर्माण करणे

**कर्जासाठी अर्ज आणि त्याची प्रक्रिया**

- कंपनी वेगवेगळे आर्थिक उत्पादन देते ज्यामध्ये ग्राहकोपयोगी उपकरण कर्ज, तारण कर्ज, बिल/ इनवॉइसवर सवलत, खेळते भांडवल कर्ज, मुदत कर्ज, भाडेपट्टीवर सवलत, इतर खरेदीचा समावेश आहे. मात्र खालील कलम फक्त किरकोळ कर्जांच्या संदर्भात जसे वैयक्तिक कर्ज, ग्राहकोपयोगी उपकरण कर्ज इत्यादी साठी लागू होईल, जेथे सदर कर्जदार एक व्यक्ती आहे आणि ज्यास मध्यम-मोठ्या कॉर्पोरेट ग्राहकांच्या तुलनेत मदतीची आवश्यकता असेल जे आर्थिक बाजार व्यवसायाशी चांगल्याप्रकारे पारंगत आणि सज्ज असतात.

- यापैकी प्रत्येक उत्पादनासाठी स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडच्या 'अर्जाचा फॉर्म/ योग्य कागदपत्र' मध्ये सर्व आवश्यक माहितीचा समावेश असेल जी कर्जदाराच्या हितास प्रभावित करेल तसेच कर्जदाराद्वारे सादर करायची आवश्यकता असलेल्या सर्व कागदपत्रांच्या तपशीलांचा समावेश असेल.

- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड कर्जदाराला इतर नॉन-बँकिंग फायनांस कंपनी (एनबीएफसी) द्वारे दिल्या जाणाऱ्या अशाच अटी आणि नियमांशी अर्थपूर्ण तुलना करणे आणि माहितीपूर्ण निर्णय घेणे सुलभ करण्यासाठी आवश्यक माहिती पुरवेल.

- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडकडे तिच्या कर्जदारांना अर्जाचा फॉर्म प्राप्त झाल्याची पावती देण्याची व्यवस्था आहे. स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड सर्व आवश्यक माहिती पूर्णपणे मिळाल्याच्या तारखेपासून वाजवी कालावधीत कर्जदाराला तिच्या निर्णयाबद्दल कळवेल.

**कर्जाचे मूल्यांकन आणि अटी/ नियम**

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड, मंजूरी पत्र किंवा इतर माध्यमाने, कर्जदाराला मंजूर झालेल्या कर्ज मर्यादेसोबतच सर्व अटी आणि नियमांविषयी लिखित स्वरुपात कळवेल ज्यामध्ये व्याज दर, उशीरा परतफेडीच्या कारणास्तव कोणतेही दंडात्मक शुल्क किंवा इतर कोणत्याही शुल्कांचा समावेश आहे.

या अटी आणि नियमांविषयी कर्जदाराची स्वीकृती स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड द्वारे नोंदीमध्ये ठेवली जाईल.

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड कर्जादाराला कर्जाच्या मंजूरीच्या/ वितरणाच्या वेळी कर्ज कराराची एक प्रत सादर करेल.

**कर्ज खात्यांमधील दंडात्मक शुल्क**

a) जर कर्जदाराद्वारे कर्जाच्या अटी आणि नियमांचे पालन न केले गेल्यास दंड आकारला जातो, ज्यास 'दंडात्मक शुल्क' मानले जाईल आणि तो 'दंडात्मक व्याज' स्वरुपात आकारले जाणार नाही जो अग्रिम रक्कमेवर आकारलेल्या व्याज दरात जोडला जातो. दंडात्मक शुल्काचे कोणतेही भांडवलीकरण होणार नाही, म्हणजे अशा शुल्कांवर पुडे व्याजाची गणना केली जाणार नाही. मात्र, कर्ज खात्यातील व्याज चक्रवाढ करण्याच्या सामान्य प्रक्रियेवर याचा परिणाम होणार नाही.

b) कंपनी व्याज दरात कोणतेही अतिरिक्त घटक जोडणार नाही आणि त्याच्या काटेकोर पालनाची खात्री करेल.

c) कर्जांवरील दंडात्मक शुल्क किंवा तत्सम शुल्कांवर, ज्यास कोणत्याही नावाने ओळखले जाईल, कंपनी बोर्डाने मंजूर केलेले धोरण तयार करेल.

d) दंडात्मक शुल्कांचे प्रमाण योग्य आणि विशिष्ट कर्ज/ उत्पादन श्रेणीमध्ये कोणताही भेदभाव न करता कर्ज कराराच्या अटी आणि नियमांचे पालन न करण्याच्या अनुसार असेल.

e) दंडात्मक शुल्काचे प्रमाण आणि कारण कंपनी द्वारे ग्राहकांना कर्ज करारात आणि सर्वात महत्त्वपूर्ण अटी व नियमांमध्ये स्पष्टपणे सांगितले जाईल, या व्यतिरिक्त कंपनीच्या संकेतस्थळावरील व्याज दर आणि सेवा शुल्कांमध्ये सुद्धा प्रदर्शित केले जातील.

f) जेव्हा जेव्हा कर्जदारांना अटी आणि नियमांचे पालन न केल्याबद्दल स्मरणपत्रे पाठविली जातात, तेव्हा लागू होणारे दंडात्मक शुल्क कळवले जाईल. या व्यतिरिक्त, दंडात्मक शुल्क आकारण्याचे कोणतेही प्रसंग आणि कारण सुद्धा कळवले जाईल.

**अटी आणि नियमांमधील बदलासह कर्जांचे वितरण**

- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड तिच्या कर्जदारांना कर्जाच्या अटी आणि नियमातील कोणत्याही बदलांविषयी कळवेल, ज्यामध्ये व्याज दर, सेवा शुल्क इत्यादीमधील बदलाचा समावेश आहे. स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड याची सुद्धा खात्री करेल की व्याज दर आणि शुल्कांमधील बदल केवळ संभाव्य रीतीने लागू केले जातील.
- कर्ज कराराच्या अंतर्गत भरणा किंवा परिपूर्ती परत घेण्याचा/ जलद करण्याचा निर्णय संबंधित कर्ज कराराच्या अनुरुप असेल.
- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड तिच्या कर्जदाराकडे सर्व तारणाची अशा कर्जदाराद्वारे सर्व बाकी रकमेची परतफेड केल्यावर किंवा कर्जदाराद्वारे घेतलेल्या मर्यादेच्या थकीत रकमेची वसूली झाल्यावरच मुक्तता करेल, जे स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड कडे तिच्या कर्जदाराच्या विरुद्ध कोणत्याही इतर दाव्यासाठी कोणत्याही वैध अधिकार किंवा ग्रहणाधिकाराच्या अधीन असेल. जर असा वजावटीचा अधिकार वापरायचा असल्यास, कर्जदारांना उर्वरित दाव्यांच्या आणि नियमांच्या संपूर्ण तपशीलांसह याबद्दल सूचना दिली जाईल ज्या अंतर्गत स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडला संबंधित दाव्याची वसूली होईपर्यंत किंवा कर्जदाराद्वारे फेड केली जाईपर्यंत तारण ठेवून घेण्याचा अधिकार आहे. औपचारिकता पूर्ण केल्याच्या 15 कामकाजी दिवसांच्या आत या अटींची पूर्तता केल्यावर ग्राहकाला ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

**सामान्य**

- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड संबंधित कर्ज कराराच्या अटी आणि नियमांमध्ये दिलेल्या उद्देश वगळता तिच्या कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करणे टाळेल (जोपर्यंत नवीन माहिती, जी कर्जदाराने अगोदर उघड केलेली नाही, स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडच्या निदर्शनात येते).
- कर्जदाराकडून कर्ज खाते हस्तांतरित करण्याची विनंती मिळाल्यास, स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडची संमती किंवा अन्यथा आक्षेप, असल्यास, कर्जदाराची विनंती मिळाल्याच्या तारखेपासून 21 दिवसांच्या आत

कर्जदाराला कळवले जाईल. सदर हस्तांतरण सर्व लागू कायद्यांशी सुसंगत पारदर्शक कराराच्या अटींनुसार असेल.

- स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड, तिच्या कर्जदारांकडून थकबाकी रकमेच्या वसूलीच्या संदर्भात अवाजवी छळवणूक करण्याचा आधार घेणार नाही, जसे कर्जदारांना सतत अवेळी त्रास देणे, कर्ज/ थकबाकीच्या वसूलीसाठी ताकदीचा वापर करणे इत्यादी. ग्राहकांशी योग्य पद्धतीने व्यवहार करण्यासाठी कर्मचारी पुरेसे प्रशिक्षित आहेत याची खात्री करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल.

- जेव्हा कर्जदार कंपनी किंवा ब्यूरोकडील खाते रद्द किंवा ब्लॉक किंवा बंद करू इच्छित असेल, तेव्हा कर्जदार स्नॅपमिंटच्या ग्राहक सेवा केंद्राद्वारे किंवा support@snapmintfin.com वर ईमेल पाठवू तशी विनंती करू शकतो. कर्जदाराने अगोदरच घेतलेले कर्ज सक्रिय राहील आणि आधीच सहमत असलेल्या त्याच्या/त्यांच्या संबंधित व्यावसायिक अटींनुसार त्याची परतफेड केली जाईल.

**तक्रार निवारण प्रक्रिया**

सध्याच्या स्पर्धेच्या युगात, व्यवसायाची शाश्वत वाढ होण्यासाठी उत्कृष्ट ग्राहक सेवा एक महत्त्वाचे साधन आहे. स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड मध्ये, ग्राहक सेवा आणि समाधान आमचे मुख्य लक्ष्य आहे. आमचा विश्वास आहे की तत्पर आणि कार्यक्षम सेवा पुरवणे केवळ नवीन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठीच नाही तर विद्यमान ग्राहकांना कायम ठेवण्यासाठी देखील आवश्यक आहे. स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडने चांगला ग्राहक अनुभव देण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत आणि आमच्या ग्राहकांना सुधारित अनुभव देण्याचा दृष्टीकोनातून एक कार्यक्षम तक्रार निवारण यंत्रणा स्थापन केलेली आहे.

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड निवारण यंत्रणा अधिक अर्थपूर्ण आणि प्रभावी बनवण्यासाठी, एक व्यवस्थित प्रणाली तयार केली गेली आहे. ही व्यवस्था तक्रारीचे निवारण योग्यरित्या आणि नियम आणि विनियमांच्या चौकटीत केल्याची खात्री करेल. संचालक मंडळ वेळोवेळी निष्पक्ष आचार संहितेचे पालन आणि तक्रार निवारण प्रणालीच्या परिणामकारकतेचे पुनरावलोकन करेल.

**a. ग्राहक तक्रारी/ गाऱ्हाणी हाताळण्यासाठी यंत्रसामग्री**

जे ग्राहक प्रतिक्रिया देऊ इच्छितात किंवा त्यांच्या तक्रारी करू इच्छितात, ते सोमवार ते शनिवार दरम्यान (राष्ट्रीय सुट्ट्या वगळून) सकाळी 10:00 ते संध्याकाळी 7:00 दरम्यान खालील माध्यमांचा वापर करु शकतात.

- Call on +91-22-48931351
- +91-22-48931351 वर कॉल करा
- Email us at support@snapmintfin.com
- support@snapmintfin.com वर आम्हाला ईमेल करा
- खालील पत्त्यावर आम्हाला पत्र लिहा:

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड, बी-904, कनाकिया वॉल स्ट्रीट, अंधेरी कुर्ला मार्ग, अंधेरी (पूर्व) , मुंबई

400093, महाराष्ट्र.

जर दिलेल्या वेळेत तक्रारी समाधान झाले नाही किंवा स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड द्वारे दिलेल्या उपायाशी ग्राहक समाधानी नाही, तर ते तक्रारण निवारण अधिकाऱ्याशी संपर्क करू शकतात. तक्रार निवारण अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्काचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

श्री. रोहित टेकचंदानी

दूरध्वनी क्र: +91-22-48931351

ईमेल आयडी: grievance@snapmintfin.com

जर वरील माध्यमातून मिळालेले उत्तर समाधानकारक नसेल, तर ते आमच्या तक्रार निवारण मंचाचे प्रमुख, श्री. विवेक गाला यांना vivek@snapmintfin.com वर लिहू शकतात.

आम्ही या माध्यमाने प्राप्त झालेल्या पत्रांना / ईमेलला 5 कामकाजी दिवसात प्रतिसाद देण्याची हमी देतो.

एक महिन्याच्या कालावधीत तक्रार/विवादाचे निराकरण न झाल्यास, सदर ग्राहक भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नॉन-बँकिंग पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे अपील करू शकतो ज्यांच्या अधिकारक्षेत्रात स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडचे नोंदणीकृत कार्यालय आहे. डीएनबीएसचे तपशील खाली दिल्याप्रमाणे आहेत:

उप. महाव्यवस्थापक, नॉन-बँकिंग पर्यवेक्षण केंद्र। विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई-400005

### b. अनिवार्य प्रदर्शनाची आवश्यकता

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड आमच्या सर्व कार्यालयांमध्ये आणि ग्राहक सेवा केंद्रांमध्ये खालील गोष्टी असतील:

- तक्रारी आणि सल्ले प्राप्त करण्यासाठी योग्य व्यवस्था.
- तक्रार निवारण अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक प्रदर्शित करणे. तक्रार निवारण विभागाची प्रक्रिया ग्राहकांच्या समाधानासाठी सर्व तक्रारीवर उपाय देणे सुनिश्चित करेल.

जर त्यांच्या पातळीवर तक्रारीचे समाधान शक्य नसल्यास ती योग्य पातळीवर नेण्याची ते खात्री करतील. जरी आमचा अंतिम प्रयत्न परिणामकारक तक्रार निवारण मिळविण्यासाठी आमच्या ग्राहकांना वरिष्ठ व्यवस्थापनाकडे तक्रार करावी लागणार नाही अशा परिस्थितीत आम्ही पोहोचू याची खात्री करणे आहे, म्हणून या तक्रारी हाताळण्यासाठी, तक्रारीची कारणे समजून घेण्यासाठी आणि पुनरावृत्ती रोखण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे पुनरावलोकन करण्यासाठी आम्ही एक मजबूत यंत्रणा तयार केली आहे.

c. **कालावधी**

तक्रारी नोंदवण्यासाठी, ग्राहक वर नमूद केलेल्या कोणत्याही माध्यमाचा वापर करू शकतात (ग्राहक तक्रारी हाताळण्यासाठी आंतरिक यंत्रणेविषयी बिंदु (a) पहा). तक्रार लिखित स्वरुपात प्राप्त झाली असल्यास, स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड एक आठवड्याच्या आत पावती/ प्रतिसाद पाठवण्याचा प्रयत्न करेल. एकदा प्रकरणाची तपासणी झाल्यावर, स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड तक्रार प्राप्त झाल्याच्या एक महिन्याच्या आत एकतर ग्राहकाला अंतिम प्रतिसाद पाठवण्याचा किंवा अधिक वेळ मागण्याकरीता सूचना पाठवण्याचा प्रयत्न करेल.

आमच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींकडे योग्य दृष्टीकोनातून पाहिले जाईल आणि सर्व संभाव्य कोनातून त्यांचे विश्लेषण केले जाईल.

कोणत्याही मुद्द्यावरील स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेडच्या दृष्टीकोनातून सूचना ग्राहकांना कळवली जाईल. ज्या तक्रारींच्या मुद्द्यांच्या तपासणींसाठी आणखी काही वेळेची आवश्यकता असेल त्यांची तातडीने दखल घेतली जाईल.

ग्राहकांच्या तक्रारी/ गाऱ्हाणी हाताळण्यासाठी स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड द्वारे कोणत्याही नवीन बदलांचा समावेश केल्यावर वरील धोरणाचे वेळोवेळी पुनरावलोकन/संधोशन केले जाईल ज्यामध्ये तक्रारीचे नवीन माध्यम सादर करण्याचा समावेश आहे.

**जास्त व्याज आकारण्याचे नियमन**

ग्राहकांकडून कर्जावर जास्त व्याज आणि शुल्क आकारले जाणार नाही याची खात्री करण्यासाठी, स्नॅपमिंटच्या मंडळाने व्याज दर निश्चित करण्यासाठी धोरण स्वीकारले आहे. प्रक्रिया आणि इतर शुल्क (व्याज दर धोरण). सदर धोरण कंपनीचे संकेतस्थळ snapmintfin.com वर उपलब्ध आहे. मंडळ व्याज दर धोरणाचे वेळोवेळी पुनरावलोकन देखील करते.

सदर धोरणात व्याज दर, प्रक्रिया आणि इतर शुल्क निश्चित करण्यासाठी योग्य आंतरिक तत्त्वांचा आणि प्रक्रियांचा समावेश आहे. कंपनी एक व्याज दर मॉडेलचा उपयोग करते जे कर्ज आणि अग्रिमांसाठी आकारला जाणारा व्याज दर निश्चित करण्यासाठी निधीचा खर्च, मार्जिक आणि जोखिम प्रिमियमविषयी विचार करते. आकारण्यात येणारा सदर व्याजदर कर्जदाराच्या जोखीम प्रोफाइलवर अवलंबून असतो. व्याज दर वार्षिक असेल जेणेकरुन कर्जदाराला खात्यावर आकारल्या जाणाऱ्या नेमक्या दरांविषयी माहिती असेल. निश्चित वितरण तारखेच्या पलीकडे आकारलेले कोणतेही जास्तीचे व्याज ग्राहकाला परत केले जाईल. कंपनी कर्जदाराच्या परतफेडीच्या क्षमतेविषयी योग्य तो तपास करेल आणि आरबीआयच्या केवायसी मार्गदर्शक तत्वांचे पालन करेल.

**आकस्मिक घटना**

स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड द्वारे उल्लेखित आणि केलेली विभिन्न आश्वासने सामान्य संचालन परिस्थितीच्या अंतर्गत लागू आहेत. आकस्मिक घटनांच्या प्रसंगी, स्नॅपमिंट फायनांशियल सर्विसेस प्रायवेट लिमिटेड ग्राहकाच्या/ग्राहकांच्या आणि सर्वसामान्य जनतेच्या संपूर्ण समाधानासाठी निष्पक्ष आचार संहितेच्या अंतर्गत वचनबद्धतांची पूर्तता करू शकणार नाही.

**निष्पक्ष आचार संहितेचे पुनरावलोकन**

निष्पक्ष आचार संहितेचे कंपनीच्या संचालन मंडळाद्वारे वर्षातून एकदा, आणि तसेच, आवश्यकता पडल्यावर आरबीआयच्या नियम, कायदे आणि प्रचलित बाजार पद्धतींच्या अनुसरुन वेळोवेळी सुद्धा पुनरावलोकन केले जाईल.